तात्काळ.
-------

क्र.माध्य-३/[१४]नमाशा/मान्यता/पुवि/९१.९२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय,
दि. 6 SEP 1991

प्रति,
सचिव,
गुंजवणी विभाग विकास महामंडळ,
हातवे बु. ता. भोर, जि. पुणे.
--------------------

विषय :- सन. १९९१-९२ या शै.वर्षात नविन माध्यमिक [illegible]
शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- मा.उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचेकडील
पत्र क्रं.एसएसएन/१०९१/२७६४/माशि-१ दि. २४ ऑगस्ट ९१
चे पत्र.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९१ पासून विना-अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यांत येत आहे.

[१] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रं.एसएसएन १०८८/१६६९-एन/माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे [ उदा. विदयार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

२..

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.च्या] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून वास्तव्याने पात्र ठरलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेश वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [ प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन-फीज ] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यात येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमा-नुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण-संचालक यांची पूर्व परवानगी, शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमा खाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्थे विरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

२ 3/-

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

त्या बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रदद झाल्याचे समजण्यात येईल.

| अनु. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | गुंजवणी विभाग विकास मंडळ, हातवे बु. | हातवे बु. ता. भोर. | ८वी जून ९१ पासून | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित पत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थानां मान्यता देण्याची पध्दती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमा प्रमाणे व पत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे

सही/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतलिपी.

शिक्षणाधिकारी[माध्य] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नविन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थे विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा.उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३] मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

जा. क्र माध्य-२/५वी ते७वी/मान्यता/पी३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-४११ ००१ यांचे का
दिनांक :- 11 AUG 1993

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद - - पुणे -- ----

विषय :- इ. ५वी ते ७ वी वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणे बाबत.
न्यू-इंग्लिश स्कूल,हातवे ,बु-।। ता-भोर

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक -

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, या शैक्षिणक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५वी ते ७वी चे वर्ग नव्याचे सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्र. एसएसएन/१०८५ २३४८५[२४४एन] माशि-१, दि. २९/१/८६ व दि. २०/१२/८८ च्या शासनादेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५वीते ७वी~~च्या~~ वर्गांना जून, १९ ९३ च्या शैक्षणिक वर्षापासून [विना] अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

<u>अटी:-</u>१] इ. ५वी ते ७ वींच्या वर्गांची परवानगी ही विनाअनुदान तत्वावर

२] मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आव

३] तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर
कारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे तसेच आपण सदर शाळेत १५ दिवसाचे आ देऊन इ. ५ वी ते ~~७ वी च्या~~ तथा सुरु असलेल्या वर्गांची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात कळवावा.

मा. शि. उ. सं. यांच्या मान्य
टिपणीनुसार,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

प्रत :-

१] मा. अवर सचिव, शिक्षण सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांना सविनय सादर.

२] मुख्याध्यापक न्यू. इंग्लिश स्कूल ,हातवे बुा ता-भोर जिल्हा पुणे